वेळ : 3 तास **नमूना कृतिपत्रिका - 2 (2022-23)** एकूण गुण : 80

**सुचना :** 1. सूचनेनुसार आकलकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात
2. आकृत्या पेनानचे काढाव्यात.
3. उजवीकडे अंक हे प्रश्नांसाठीचे पूर्ण गुण दर्शवितात.
4. नीटनेटकेपणा, स्वछता, लेखन यांकडे लक्ष दयावे.
5. उपयोजित लेखनातील कृतींसाठी आकृतीची आवश्यकता नाही.

## विभाग 1 : गदय

### पठीत गदय

**प्र. 1. (अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. नावे लिहा :** 2

i) झाडावरून गळून पडणारी - ☐

ii) पानाने गवतपात्याला दिलेली उपमा - ☐

iii) कर्णकटू आवाजाने जागे होणारे - ☐

iv) संजीवक स्पर्शाने गवतपात्याला जागे करणारा - ☐

Genius JEE NEET CET FOUNDATION Institute

हिवाळा नुकताच सुरू झालेला होता.

झाडावरून एकामागून एक पिकलेली पाने गळून पडू लागली. पट...पट...पट...

त्यांचा तो पट...पट...असा कर्णकटू आवाज...

तो आवाज ऐकून धरणीमातेच्या कुशीत झोपी गेलेले एक चि मणे गवताचे पाते जागे झाले. गिरक्या खात खात जमिनीवर येणाऱ्या एका पानाला ते म्हणाले,

''पडता पडता कि ती कटकट करतोयस तू? तुझ्या या दंग्यानं माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चुराडा झाला की!''

पानाला राग आला. ते चिडून म्हणाले, ''अरे जा! चिडखोर बिब्बा कुठला! मातीत जन्मून मातीतच लोळणाऱ्या तुझ्यासारख्या क्षुद्र गवताच्या पात्याला आमच्या या उच्च वातावरणाची कल्पना कशी येणार? हा दंगा नाही, बेटा! हे गाणं चाललंय! जन्मात कधी आ न करणा ऱ्या तुझ्यासारख्या अरसिकाला ते समजाय चं नाही!'' हे बोलता बोलताच ते पान पृथ्वीवर पडले आणि धरणीमातेच्या कुशीत झोपी गेले.

ते पुन्हा जागे झाले, ते वसंताच्या संजीवक स्पर्शाने! त्या स्पर्शात विलक्षण जादू होती. त्या जादूने आता त्या पानाचे रूपांतर गवताच्या चिमुकल्या पात्यात झाले होते. पुन्हा हिवाळा आला. थंडीने कुडकुडत गवताचे पाते धरणीमातेच्या कुशीत लपू लागले-झोपू लागले. पण पुन:पुन्हा त्याची झोपमोड होऊ लागली. जिकडे तिकडे झाडांवर पाने सळसळत होती...पट पट असा आवाज करीत पृथ्वी वर पडत होती!

ते गवताचे पाते कपाळाला आठी घालून स्वत:शीच पुटपुटले, 'काय ही हिवाळ्यातली पानं! जीव खाऊन टाकला यांनी अगदी! केवढा हा कर्णकटू आवाज...छी छी छी! माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चेंदामेंदा केला यांनी!'

**2. कारणे लिहा :** 2

i) झोपी गेलेल्या चिमुकल्या गवताच्या पात्याने गळून पडणा-या पानाकडे तक्रार केली; कारण ..................

ii) वसंताच्या संजीवक स्पर्शाने पानाचे रूपांतर चिमुकल्या पात्यात झाले; कारण ...............

**3. वसंतऋतुच्या आगमनाने सृष्टीत होणारे बदल तुमच्या निरिक्षणाने लिहा.** 3

**प्र. 1. (आ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. आकृती पूर्ण करा :** 2

महर्षी कर्वे यांचे स्त्रियांबाबतची स्वप्ने →

I) ......................................
ii) ......................................
iii) ......................................
iv) ......................................

महर्षी कर्वे यांजमध्ये स्थितप्रज्ञाची लक्षणे होती. जो स्वतःच्या सुखदुःखात अविचल राहातो; मात्र, दुसऱ्याच्या दुःखात दुःखी होतो, दुसऱ्याच्या सुखात सुखी होतो, तो खरा स्थितप्रज्ञ! महर्षी कर्वे यांचे लक्ष केवळ समाजसुधारणेत होते. त्यांना कुणावर ऋण ठेवाय चे नव्हते तसेच त्यांना कुणाच्या ऋणातही राहायचे नव्हते. कर्व्यांना कुठे जेवावे लागले तर ते पैसे काढून ताटाशेजारी ठेवून उठत. आपल्यावर पैसे कोणाला खर्च करू देत नसत. इतरांना सहसा न साधणारे कार्य करायचे होते महर्षी कर्वे यांना!

भारताचे अर्धांग जे स्त्रिया; त्याच अनपढ राहिल्या तर देश अर्धांगवायू झालेल्या व्यक्ती सारखा होईल. एका बाजूला या देशाला आपण भारत'माता' म्हणतो; सरस्वतीला आपण वाङ्मयाची जननी मानतो आणि दुसरीकडे स्त्री निरक्षर अज्ञानी ठेवतो, हा चीड आणणारा विरोधाभास त्यांना घालवायचा होता. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी, जपानच्या धर्ती वर इ. स. १९१६ साली भारतातले पहिले महिला विद्यापीठ पाच स्त्रियांना दाखल करून स्थापन केले. आगबोटीने प्रवास करण्याच्या त्या जुन्या जमान्यात, महर्षी कर्व्यांनी जगप्रवास करून स्त्रीशिक्षणाचे माहात्म्य सर्वत्र बिंबवले. जगभर स्त्रीशिक्षणाबद्दल सभा केल्या. स्त्री ही स्वाभिमानी असली पाहिजे, ती शिकली पाहिजे, उच्चविद्याविभूषित होऊन पुरुषांशी स्पर्धा करू शकली पाहिजे, हे त्यांचे स्वप्न होते. त्यांत त्यांना दोन कार्ये करावयाची होती. एका टोकावर, स्त्री साक्षर करणे हे जटिल कार्य व दुसऱ्या टोकावर, तिला पुरुषांच्या बरोबरीने स्पर्धेत उतरवणे हे अटीतटीचे कार्य! पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांवरील पारतंत्र्याचे जोखड उखडून टाकावे हे महाकठीण काम होते. गुरुत्वाकर्षणाविरुद्ध पृथ्वी बाहेर पडणाऱ्या रॉकेटसारखीच क्षमता तेथे आवश्यक होती.

Genius JEE NEET CET FOUNDATION Institute

**2. एका वाक्यात उत्तरे लिहा :** 2

i) स्थितप्रज्ञ कोणाला म्हणावे ?

ii) चीड आणणारा विरोधाभास कोणता ?

**3. 'स्त्रियांनी शिकणे अत्यंत गरजेचे आहे', या विधानामागील अण्णांचा दृष्टिकोन स्पष्ट करा.** 3

## अपठीत गदय

**प्र. 1. (इ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. i) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** 1

१) खूप पडणारा पाऊस थांबविण्यासाठी केला जाणारा उपाय म्हणजे ........

क) वृक्षतोड करणे ख) ढग अडवणे ग) पाऊस पोळवणे क) पाणी साठवणे

२) जिथं ........ आहेत तिथं भरपूर पाऊस पडतो.

क) मोठी सरोवरे ख) प्रचंड धरण ग) मोठा समुद्र क) प्रचंड वृक्ष

ii) आकृतिबंध पूर्ण करा. 1

| | 'आडवी खोरी' या भागाची वैशिष्ट्ये | |
|---|---|---|

**1971** नंतर बरीच वर्षे उलटली. या सर्व जाणा-या वर्षांचं एक महत्त्वाचं वैशिष्टय म्हणजे वरचेवर पावसाचे प्रमाण कमी कमी होत गेलेले आहे. मागच्या वर्षी तर जुलै आणि ऑगष्ट असे दोनच महिने पाऊस पडला. एकंदरीतच काय की, गेल्या वीस-बावीस वर्षांमध्ये पाऊस अतिशय कमी होऊन गेलेला आहे. पूर्वीही दुष्काळ पडत असत; पण प्यायच्या पाण्याचे कधी प्रश्न निर्माण झालेले नव्हते; पण आता मात्र मार्चपासूनच प्यायचे पाणी असंख्य खेडयांना मिळेनासे होते. असे का व्हावे? पावसाचे प्रमाण कमी झाले आहे, हे तर याचे कारण आहेच; पण आमचा पाण्याचा ऐशआरामासाठी वापरही प्रचंड वाढला आहे. पंचतारांकित हॉटेल्समधून ज्या पद्धतीने पाण्याची उधळपट्टी होते, ती पाहीली की वाटते, आपल्या देशात सर्वत्र चेरापुंजीएवढा पाऊस पडत असणार!

असे का झाले? जिथे खूप पाऊस पडत होता, अगदी पाऊस थांबवण्यासाठी पावसाला पोळवले जात होते, तिथला पाऊस कुठे गेला? कुणी घालवला हा पाऊस? आणि या प्रश्नाचे उत्तर काही फारसे अवघड नाही. आम्हीच करंटया लोकांनी पळवून लावला आहे. असं सांगतात की, प्रचंड प्रमाणात वृक्षतोड झाल्यामुळेच पाऊस येईनासा झाला आहे. (आजही जिथं प्रचंड वृक्ष आहेत तिथं भरपूर पाऊस पडतोच.) आणि ही गोष्ट खरी असावी असे वाटते. आमच्या लहानपणी आमच्या गावाजवळ एक जंगल होते. विशेषत: बाराहळी नावाच्या गावाकडे जाताना हे जंगल लागायचे. त्याला तेव्हा 'आडवी खोरी' म्हणायचे. या आडव्या खो-यात एवढी दाट झाडी होती की, पुढचा रस्ता शोधून काढणे अवघड जात असे. भरदुपारी वाघ पाहायचा असेल, तर तो आडव्या खो-यात दिसलाच म्हणून समजा!

**2. खेडयांना पिण्याचे पाणी न मिळण्याची दोन कारणे लिहा :** **2**

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

## विभाग 2 : पदय

**प्र. 2. (अ) पुढील पदयउतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. आकृती पूर्ण करा :** **2**

मन वाईट गोष्टींकडे वळू नये म्हणून करायच्या गोष्टी

सुसंगति सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;
कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो;
सदंघ्रिकमळीं दडो; मुरडितां हटानें अडो;
वियोग घडतां रडो; मन भवच्चरित्रीं जडो ।।
न निश्चय कधीं ढळो; कुजनविघ्नबाधा टळो;
न चित्त भजनीं चळो; मति सदुक्तमार्गीं वळो; ।
स्वतत्त्व हृदया कळो; दुरभि मान सारा गळो;
पुन्हां न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो ।।
मुखीं हरि! वसो तुझी कुशलधामनामावली,

क्षणांत पुरवील जी सकलकामना मावली; ।
कृपा करिशि तूं जगत्रयनिवास दासावरी,
तशी प्रगट हे निजाश्रितजनां सदा सांवरी ।।

**2. खालील गोष्टींच्या बाबतीत कवी परमेश्वराजवळ कोणती विनंती करतात ते लि हा.** 2

| **गोष्टी** | **विनंती** |
|---|---|
| १) निश्चय | ........... |
| २) चित्त | ........... |
| ३) दुरभिमान | ........... |
| ४) मन | ........... |

**3. योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा :** 2

**(अ) कवींच्या मते मनातील सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात म्हणून**

(१) सतत परमेश्वराच्या सान्निध्यात राहावे. (२) सतत परमेश्वराचे नामस्मरण करावे.

(३) सतत आत्मबोध घ्यावा. (४) चारधाम यात्रा करावी.

**(आ) सदंघ्रिकमळीं दडो; म्हणजे**

(१) कमळाच्या फुलात चित्त सदैव गुंतो. (२) कमळातून मधुसेवन करणाऱ्या भुंग्याप्रमाणे सज्जनांच्या पायाशी मन गुंतो.

(३) कमळाच्या व भ्रमराच्या सौंदर्यात मन गुंतो. (४) कमळात मन लपून राहो.

Genius JEE NEET CET FOUNDATION Institute

**4. वाईट गोष्टींचा मोह टाळण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ते लिहा :** 2

**प्र. 2. (आ) पुढील मुद्दयांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा :** 4

| मुद्दे | आकाशी झेप घे रे | किंवा वस्तू |
|---|---|---|
| 1. प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री - | | |
| 2. प्रस्तुत कवितेचा विषय - | | |
| 3. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश - | | |

**प्र. 2. (इ) रसग्रहण :** 4

**पुढे दिलेल्या काव्यपंक्तीचे रसग्रहण करा :**

'झरा लागेलच तिथे, खोद आणखी जरासे'

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. 3. पुढीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> कृती सोडवा :** 6

**1. 'कठोर परिश्रमांमुळेच स्वाती महाडिक यांना स्वत:चा निर्धार पूर्ण करता आला', या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.**

**2. 'माणूस पेरा! माणुसकी उगवेल!' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

**3. खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)**

व्युत्पत्ती कोश
- निर्मितीचा ठराव
- निर्मितीची जबाबदारी
- निर्मितीसाठी अर्थ साहाय्य
- त्याचे प्रकाशन

## विभाग 4 : भाषाभ्यास

**प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**1. पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा :** **2**

i) पुरीभाजी -

ii) दररोज -

**2. i) 'अव' हा प्रत्यय लावलेले दोन शब्द लिहा :** **1**

**ii) पुढील शब्दांना 'वान' हा उपसर्ग लावून शब्द तयार करा :** **1**

1) गुण - 2) धन -

**3. पुढीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा :** **4**

i) हुक्की येणे - ii) पाढा वाचणे -

iii) तोंडसुख घेणे - iv) जीव खाणे -

Genius
JEE NEET CET FOUNDATION Institute

**प्र. 4. (आ) भाषासौंदर्य :**

**1. शब्दसंपत्ती :**

**i) पुढील शब्दसमूहांसाठी एक शब्द लिहा.** **1**

(1) संपादन करणारा =

(2) आठवडयातून एकदा प्रसिद्ध होणारे =

**ii) पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **1**

(1) काया - (2) आकाश -

**iii) पुढील शब्दांचे समानार्थी दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.** **1**

बालपण (बाल व पण हे शब्द वगळून)

**iv) पुढील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.** **1**

(1) तिमिर x (2) स्मरण x

**2. अचूक शब्द ओळखा :** **2**

i) नीर्जीव/ निर्जिव/ निर्जीव/ नीर्जिव

ii) समिक्षा/ समीक्षा/ सममीक्षा/ समिक्शा

**3. पुढील वाक्यात योग्य विरामचिन्हे वापरा :** **1**

i) मी म्हटलं उगीच भ्रम आहे लोकांना

**4. पुढील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा :** **1**

i) Census

ii) Lyric -

## विभाग 5 : उपयोजित लेखन

**प्र. 5. (अ) पुढीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा :**

**1. पत्रलेखन :** **6**

**पुढील निवेदन वाचा आणि त्यावर आधारित कोणतीही एक कृती सोडवा :**

**चला वाचवू वसुंधरा**

**माझी वसुंधरा अभियान**

**आयोजक**

सरपंच ग्रामपंचायत कार्यालय

तालुका चिपळूण जि रत्नागिरी

**वृक्ष लागवड कार्यक्रम**

**15 जून ते 25 जून**

वृक्षमित्र या नात्याने आयोजकांना वृक्षलागवडीकरिता रोपांची मागणी करणारे पत्र लिहा

**किंवा**

विद्यार्थी या प्रतिनिधी नात्याने 'माझी वसुंधरा अभियानाचे' आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा

Genius
JEE NEET CET FOUNDATION Institute

**किंवा**

**2. सारांशलेखन :**

**खालील उता-याचा एक तृतीयांश सारांश लिहा :** **6**

**विभाग 1 : गदय (इ) [प्रश्न क्र. (इ)] मधील उता-याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा :**

**प्र. 5. (आ) पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (शब्दमर्यादा प्रकारानुसार 60 ते 90 शब्द)** **10**

**1. जाहिरात लेखन :** **5**

पुढे दिलेल्या माहितीच्या आधारे आकर्षक जाहिरात तयार करा.

ताजा भाजीपाला, सेंद्रिय पद्धतीचा वापर,
सर्व प्रकारची फळे उपलब्ध, घरपोच सोय,
ऑनलाइन बील दयायची सोय, ग्राहकांचे समाधान

**2. बातमीलेखन :** **5**

**पुढे दिलेल्या शब्दांवरून बातमी तयार करा.**

कोरोना आला नी ............

गाव स्वच्छ झाले.

**3. कथालेखन :** **5**


**खालील मुद्यांवर आधारित कथालेखन करा.**

अवंतिका नावाची मुलगी -- कुटुंबात तिघी बिहणी--- परिस्थिती सर्वसाधारण--अवंतिका हुशार-- तिघींची जिदद्--

शिक्षणाबरोबर शेतीकाम--मोठे स्वप्न- स्वप्न साकार-- तिची पापलिस अधिक्षक, शिक्षिका व सनदी अधिकारी म्हणून नियुक्ती.

**प्र. 5. (इ) पुढील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा :** **8**

**1. खाली दिलेल्या संकल्पना चित्रारून निबंध लेखन करा :**




**2. आत्मकथन :**

खालील मुद्यांच्या आधारे आत्मकथन करा.

'मी एस. टी. बोलतेय'.....

अल्पदरात सर्वत्र सेवा

24 तास अखंड सेवा

लॉकडाऊन काळात प्रथमच बंद



दळणवळण विस्कळीत

लोकजीवनातील महत्त्व

खेडयापाडयात सर्वदूर सेवा